# ECHO OF HIS CALL

# बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE
REACHING NATIONS

*India's National Spiritual Newspaper*

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHASHI TIWARI

VOL: XXV | AUGUST 2023 | No. 07

## पवित्र शास्त्र

**कृपया हा शास्त्र भाग पाठ करा**

स्तोत्र : १०३:८-१७

८) परमेश्वर कनवाळू व कृपाळू मंदक्रोध व दयामय आहे.

९) जो सर्वदाच दोष देत राहणार नाही, तो आपला क्रोध सर्वकाळ राहू देणार नाही.

१०)आमच्या पातकांच्या मानानें त्याने आमचे पारिपत्य केले नाही, त्याने आमच्या दुष्कर्माच्या मानाने आम्हीस प्रतिफळ दिले नाही.

११)कारण जसे पृथ्वीच्यावर आकाश फार उंच आहे, तशी त्याची दया त्याचें भय धरणाऱ्यावर विपुल आहे.

१२)पश्चिमेपासून पूर्व जितकी दूर आहे

आम्हांपासून दूर केले आहेत.

१३)जसा बाप आपल्या मुलांवर ममता करितो, तसा परमेश्वर आपले भय धरणाऱ्यांवर ममता करितो.

१४)कारण तो आमची प्रकृति जाणतो, आम्ही केवळ माझी आहो हे तो लक्षांत ठेवितो.

१५)मानव-प्राण्यांचे आयुष्य गवतासारखे आहे, वनांतील फुलाप्रमाणे तो फुलतो.

१६)वारा त्यावरून गेला म्हणजे तें नाहीसें होते, आणि त्याचा त्या ठिकाणाशी पुनशपी संबंध जडत नाहीं;

१७)परंतु परमेश्वराची दया त्याचें भय धरणाऱ्यांवर युगानुयुग असते आणि त्याच्या न्यायत्वाचा अनुभव त्यांच्या पुत्रपौत्रांस घडतो.



# आखोर (ताप देणारी) खिंड : आशेचे द्वार

THE VALLEY OF ACHOR:

A DOOR OF HOPE!

(पास्टर अन्जेलिना सेल्वाकुमारी)



येशू ख्रिस्ताच्या नामात अभिवादन. देवाने आम्हा सर्वांना २०२३ चे सात महिने त्याच्या कृपेत राखले त्याबद्दल मी त्याचे आभार मानिते. आजपर्यंतचे हे वर्ष काहि जणांसाठी आशीर्वादाचे ठरले असणार आणि काही जणांकरिता नसणार. काहिजणांसाठी त्यांच्या जीवनातील हे , सर्वात वाईट वर्ष असणार आणि इतरांकरिता अतिशय उपयुक्त असे असणार!

प्रत्येक स्थितीत आपण हे लक्षात ठेविले पाहिजे, की देव चांगल आहे, आणी जे कांहि तो करीतो, ते चांगलेच करीतो! तो आपण जर त्याजवर आपली आशा, आपला भरोसा आणि आत्मविश्वासही टाकला तर सर्वकाहि चांगल्या साठीच घडवित असतो. (चांगले - वाईट आणि कुरुप - भयानक) तो विश्वसनिय देव आणि एक चांगल पिता असल्यामुळे, त्याच्या वेळेत सर्व काहि आशीर्वादीत होणार.

मी यहोशवा या पुस्तकातील आखोर खिंडीत घडलेली घटना वाचत असताना मी अतिशय गोंधळून गेले. अतिशय दुःखदायक आणि भीषण घटना. आखान आणि त्यांच्या कुटुंबास दगडमार करून अग्नीने जाळून टाकण्यात आले असे हे स्थळ. यावरुन इस्त्राएल लोकांनी या स्थळास आखोर (ताप देणारी) खिंड असे नाव दिले (यहोशवा ७:२५-२६)

(...पान ४ वर)



एको ऑफ हिज कॉल पाच मिनिटांचा संदेश

यू ट्युब ख्रिश्चन चॅनल

पास्टर सॅम सेल्वा राज

यांच्या सोबत प्रार्थनेत सहभागी होण्याची संधी

इंग्रजी, हिन्दी, तमिळ आणि तेलगु

प्रतिदिनी - पहाटे पाच वाजता रविवारची तमिळ भक्ति - ८.३० सकाळी

# ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)



## तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...

REACHING NATIONS



### आमचे कार्याविषयीचे धोरण

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.


CHIEF EDITOR

Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.

ADMINISTRATION

Bro. N. Prakasam, M.A., General Manager
Dr. Rabinder Boaz, M.S.
Bro. K. Puratchivendan

EDITORIAL BOARD

Sis. Jesy Veena Sam
Sis. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Dr. A. Richard Samuel, M.A., Ph.D.
Rev. Dr. K.R. Rajasekaran



EDITOR, PUBLISHER & PRINTER

Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.

Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 95661 31858

E.mail ID

sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in

WEBSITES

www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.com

YOUTUBE CHANNEL

Echo of His Call


## ''परमेश्वर तुला आशीर्वाद देवो व तुझे रक्षण करो'' (गणना ६:२४)

### जाळे तुटले! हा तुमचा समय आहे!!

**THE NET BREAKS! THIS IS YOUR TIME!!**

देवाच्या अतिप्रीय लेकरांनों ।

आम्ही आपल्या प्रभु आणि तारणाऱ्या येशु ख्रिस्ताच्या अतुलनिय नामात तुम्हाला प्रेमाने शुभेच्छा देत आहोत.

जागतिक स्थितीचे चित्र समोर ठेवून, आम्ही ख्रिस्त येशूचे शुभवर्तमान खात्रीपूर्वक सर्व जगभरान नेऊ इच्छित आहोत. आमच्या खाली नमूद केलेल्या सेवा सर्व मर्यादा ओलांडून पुढे जात आहेत.

१) पोस्टा द्वारे आणि ईमेलच्या द्वारे १६ भाषेत **एको ऑफ हिज कॉल** मासिक

२) पत्र व्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम (तामिळ, इंग्रजी आणि हिन्दी भाषेत)

३) मडळी सेवा (मुख्य मंडळी आणि शाखा मंडळ्या)

४) **नहेम्या बायबल कॉलेज** (चेपॉक आणि संतोषपुरम येथे तामिळ आणि वेलाचेरी येथे हिन्दी भाषेत)

५) **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल** (इंग्लीश माध्यम)

६) **एको ऑफ हिज कॉल** मुद्रणालय



*पास्टर सॅम यांच्या सह कांही दिक्षीत विद्यार्थी - २०२३*

७) **एको ऑफ हिज कॉल** यूट्यूब चॅनल वरून दररोज पहाटे ५ वाजता पाच मिनिटांचे मननपर संदेश- तामिळ, तेलगु, हिन्दी आणि इंग्रजी भाषेत रविवारी देखील संदेश प्रसारीत होतो. प्रसार माध्यमाद्वारे आणखीन इतर सेवा देखील आहेत.

वरील सर्व सेवांकरिता देव त्याची कृपा पुरवित आहे; हे तुमच्या प्रार्थना, उत्तेजनपर शब्द आणि पाठबळा द्वारे सिद्ध झाले आहे. आम्ही हि सेवा सत्यतेने आणि प्रामाणिकपणे करीत असताना, सैतान त्याच्या कावेबाज फसव्या योजनांव्दारे हल्ला करण्याचा प्रयत्न करीत असतो, ज्या विषयी उघडपणे बोलता येत नाहि. तुम्ही आमच्या करीता प्रार्थना करणार कां?

आमच्या **नहेम्या बायबल कॉलेज**च्या कार्यक्रमात जलद गतीने वाढ होत आहे. ज्या देवाने टपाला व्दारे बायबलकोर अभ्यासक्रम आणि थियॉलॉजीकल अभ्यासक्रम सुरू करण्यास मदत केली, त्याने आता आम्हाल नवीन अभ्यासक्रम नियमित (सायंकालीन आणि निवासी) सुरु करण्यास मदत केली आहे




*नहेम्या बायबल कॉलेज : संतोषपुरम, विशेष सभा*

आमचे संतोषपुरम येथील **नहेम्या बायबल कॉलेज** पुन: सुरु करण्या संबंधातील विशेष पाहुणे आणि ईश्वर विज्ञान विद्वानांची ४ जून रोजी बायबल बायबल कॉलेजच्या जागेत सभा घेण्यात आली होती.

या सभेत संतोषपुरमच्या C.Th., Dip.Th. आणि B.Th. हे आभ्यासक्रम सुरू करण्याचे प्रार्थनापुर्वक सर्वानुमते ठरविण्यात आले. आणि आता आम्ही त्या कामात व्यस्त आहोत. देवाच्या लोकांच्या मनात कदाचीत असा प्रश्न येईल, ''सेवाकार्यात अगोदरच पुष्कळसा प्रयास आणि समस्या असताना हि नवीन सेवा कां सुरू करावी?'' देव आमच्या अंत:करणात आम्ही हे साहस तातडीने स्विकारण्याचा आग्रह करीत आहे देव आमच्या अंत:करणात





आम्ही ही नविन योजना साहसाने सुरु करण्या विषयी घालत आहे. त्यामुळे आम्ही शांत राहू शकत नाही. देवाच्या इच्छेनुसार सर्व काही घडून येईल.

आपल्याला केवळ एकच आयुष्य आहे आणि ते देखील लवकर संपणार!! प्रभु येशू ख्रिस्तासाठी जे काही शक्य आहे ते करण्याची माझी मनापासूनची इच्छा आहे.

आताच्या घडीला आमच्या सेवा कार्यात २०० पेक्षा अधिक सेवक आणि स्वयंसेवक कार्यरत आहेत. आमच्या जवळ जरी सेवकांची आणि आर्थिक कमतरता आहे तरी देखील या बायबलच्या वचनांवर नवीन बायबल कॉलेजची योजना सुरू करण्यास पुढे पाऊल टाकीत आहोत, ''**पहा तो गर्वाने फुगाला आहे, त्याचा आत्मा त्याची ठायी सरळ नाही; धार्मिक तर आपल्या विश्वासाने वाचेल.**'' हबकूक २:४. ''माझा नीतिमान पुरुष विश्वासाने वाचेल; तो जर माघार घेईल; तर व्याजविषयी माझ्या जीवाला संतोष वाटणार नाही. (इब्री. १०.३८).

लूक ५व्या अध्यायात आपण वाचतो, येशूने त्याच्या शिष्यांना पुष्कळशे. मासे पकडणे शक्य होऊ दिले जे त्यांना जमले नाही. त्यांच्या जाळ्यात इतके मासे आले की ते फाटू लागले; त्यामुळे त्यांना दुसऱ्या मचव्यांची मदत मागावी लागली.

''**तेव्हा जे भागीदार दुसऱ्या मचव्यात होते त्यांनी येऊन आपणाला सहाय्य करावे म्हणून त्यांनी त्यांस खुणाविले; मग ते आल्यावर दोन्ही मचवे इतक भरले की ते बुडू लागले.**'' (लूक ५:७)

अशाच प्रकारे, देवाने **एको ऑफ हिज कॉल**ची सर्व सेवा कार्य असंख्य चमत्कार करून आणि आम्हाला किंमत म्हणून अनेक आत्मे देऊन विपुल आशीर्वादीत केली.

तुम्ही वाचकांनी येऊन आमची सेवाकार्य पाहावी याकरीता इशारा करीत आहोत! या आणि देवाचे सेवाकार्य पाहा!! आमचा येशू ख्रिस्तावरील विश्वास कशा प्रकारे कार्यरत आहे ते समजून येईल.

आमच्या जवळ जरी नियमित आर्थिक उत्पन्न नाहि, प्रभु दररोज त्याच्या लोकांना जे त्याचावर भरोसा ठेवितात उचलून धरीत



आहे - आधार देत आहे तो विश्वसनिय आहे. ''**तुम्हांस पाचारण करणारा विश्वास आहे तो हे करीलच.**'' (१ थेस्सलनी ५.२४).

आत्म्यामुळे आमची जाळी फाटत आहेत. जाहिरात न करीता पुष्कळशा सेवा! देवाचे अनेक सेवक !! व्यवस्थापन करण्यास आम्हाला धडपड करावी लागते!!! या, आणि कोणत्या तरी प्रकारे आम्हाला सामील व्हा. **एको ऑफ हिज कॉल** - सेवा कार्याचे जाळे जे आत्म्याने फाटत आहे; त्याला मदतीचा हात देण्यास या. **एको ऑफ हिज कॉल** सेवा १० ऑगस्ट रोजी ५५व्या वर्षात पदार्पण करीत आहे. त्याची सार्वकालीन कृपा आजपर्यंत हि सेवा कार्य चालवीत आहे. कृपया आमच्या समस्या लवकर बदलाव्या या करीता प्रार्थना करा आणि पाठबळ द्या.

तुम्हारा शक्य असेल ते करा! तुम्हाला प्रेरीत होत असेल ते करा!!

देवाची कृपा तुम्हाच्या बरोबर असो.

**ख्रिस्त येशूमधील तुमचे दास,**

**पास्टर एस. सॅम सेलवा राज आणि**
**ॲलेक्स सॅमसन सॅम**

(+91) 98412 71858 / 98410 71858,
E.mail : samselvaraj333@gmail.com

(पान १ वरुन...)

आखोर खिंडीचा अर्थ 'त्रास' किंवा दुःख आणि ती 'आशेचे दार' कशी झाली. जी जागा दुःख, त्रास, अपयश, शाप, मृत्यु, नाश आणि निराशा यासाठी ओळखली जात होती - ती आशा, नवीन जीवन आणी नवीन सुरुवात अशा जागेत कशी काय बदलली ? तुम्ही कितीजण हे वाचीत आहात; मला ठाऊक नाहि, परंतु मी या समयी आखोर खिंडीत आहे, जेथे सर्व काहि मृतावस्थेत आणि हरवलेल्या स्थितीत आहे आणि मजकरिता काहिही घडत नाहि. मी सर्व सोडून देण्याच्या स्थितीत आहे. पिच्छा पुरविण्यात काहि अर्थ नाहि मी प्रयत्न केले परंतु पुढे जाण्याचा मार्ग नाहि. तुमच्या करीता मजकडे एक चांगली बातमी आहे; जी खिंड, अपयश आणि नाश यांचे चिन्ह होती, ती आशेचे दार झालि आणि मी प्रार्थना करिते, तोच देव तुमचे जीवन अधीक सुंदर, आकर्षक आणि अर्थभरीत करील. कारण तो देव आहे आणि तो शुन्यातून मोठ्या गोष्टि करू शकतो

प्रथम आखोर खिंडीचे महत्व पाहू या, त्यासाठी आपल्याला अगोदर झालेले युद्ध समजुन घ्यावे लागणार. यरीहोच्या युद्धात यहोशवाच्या नव्या नेतृत्वाखाली प्राप्त झालेला विजय हा यहोशवा आणि इस्त्राएलांकरिता महत्वाचा होता. त्यांच्या आकलनशक्तिच्या पलिकडे, त्यांना देवाची दैवी शक्ति अनुभवता आली. तो विजय मानवी शक्तिच्यापलीकडचा होता. देव त्यांच्याकरिता कसा लढतो, ते त्यानी पाहिले. मोठा विजय मिळाल्या बरोबर, आपल्या प्रमाणेच ते आत्मसंतुष्ट बनले. देवाचा आशीर्वाद मिळला की आपण समाधानी बनतो आणि आशीर्वाद देणारा कोण आहे विसरून जातो आणि सुखात रमून जातो. हाच आशीर्वाद आपल्यासाठी पाश किंवा जाळे ठरु शकतो याची जाणीव देखील नसते. आपला आशीर्वाद आपल्याकरिता जाळे किंवा पाश न ठरो! यरीहोच्या मोठ्या विजया नंतर देवाच्या लोकांना यरीहोच्या तुलनेत लहान असलेल्या आय नगराशी लढण्यास सामोरे जावे लागले. शक्तिशाली यरीहोशहरावर त्यांनी नुकताच विजय प्राप्त केला होता, त्यामुळे छोट्या महत्व नसलेल्या आय नगराशी लढण्याची घाई केली नाहि. अगोदरचा विजय हा देवा द्वारे प्राप्त झाला, त्यांच्या स्वबळावर नाही याचा त्यांना विसर पडला आता आयू नगराशी युद्ध करण्याचे त्यांनी ठरविले. तो निर्णय एक मोठे अरिष्ठ बनले

"**म्हणून सुमारे तीन हजार पुरुष तिकडे रवाना झाले; पण आय येथल्या मनुष्यांपुढून त्यांस पळ काढावा लागला. आय येथील मनुष्यानी त्यांतले अजमासे छत्तीस लोक मारून टाकिले आणि आपल्या वेशी पासून शवारीमापर्यंत त्यांचा पाठलाग करून उतरणीपर्यंत त्यांस मारीत नेले; त्यामुळे लोकांच्या काळजाचे पाणीपाणी झाले.**" (यरोशवा ७:४-५)

लोकांच्या काळजाचे पाणी पाणी झाले एका क्षणी ते देवाचा चांगुलपणा यरीयोवर प्राप्त झालेल्या विजयाद्वारे उपभोगीत होते. त्यानंतर अचानक एका छोट्या शहराने

(...पान ६ वर)

## विशेष बातमी

१) आमच्या **नहेम्या बायबल कॉलेज**चा २०२२ - २०२३ चा दिक्षांत समारंभ दिनांक ३ जून रोजी बी. के. एन्. पुरासावल्कमजकच्या आवारात पार पडला. एकूण बावीस (मुले मुली) उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना क्षेत्रिय सेवेकरीता पाठविण्यात आले.

२) चेपॉक आणि वेलाचेरी येथील तामिळ आणि हिन्दी भाषिक **नहेम्या बायबल कॉलेज** दिनांक ४जून रोजी सुरू झाले

३) आमच्या संतोषपुरमच्या जागतील तामिळ भाषेतील **नहेम्या बायबल कॉलेज** ३ जून रोजी सुरु झाले.

४) आमची **सेंट पॉल मॅट्रीक्यूलेशन** स्कूलचे प्राथमिक आणि माध्यमिक वर्ग १२ जून रोजी आणि हाईस्कूलचे वर्ग १४ जून रोजी सुरु झाले. शाळेत नवीन विद्यार्थी प्रवेश घेत आहेत. बंधु/बहिणींनो आम्हाकरिता प्रार्थना करा.

(थेस्सल ५:२५)


# नहेम्याह बाइबल कॉलेज
## रेसिडेन्शल कॉलेज, चेन्नई।

माध्यम: हिन्दी

*सदस्यता के लिए पंजीकृत उम्मीदवार* - ATA

सुविख्यात अंतर्राष्ट्रीय मसीही अगुवे तथा पिछले 53 वर्षों से सेवारत वरिष्ठ पासवान

Diploma in Ministry : One year
Diploma in Theology : Two years
Bachelor of Theology : Three years

योग्यता 10 वी या अधिक
जल्दी करें!

**Contact : The Chairman, Nehemiah Bible College.**

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

✶ ऑनलाइन कक्षाएं उपलब्ध हैं ✶

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

स्तुति आणि प्रार्थनेचे मुद्दे १९ ऑगस्ट ते १८ सप्टेंबर २०२३ पर्यंत

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)

## ✝ स्तुति करिता मुद्दे

**१९ ऑगस्ट** : ३ जुलै २०२३ रोजी **नहेम्या बायबल कॉलेज** पुन: सुरु करण्यास आशिर्वाद दिल्या बद्दल.

**२० ऑगस्ट** : **नहेम्या बायबल कॉलेज** मध्ये B.Th. अभ्यासक्रम सुरु करण्यास आशिर्वाद दिल्या बद्दल.

**२१ ऑगस्ट** : चेपॉक, वेलाचेरी आणि संतोषपुरम येथील **नहेम्या बायबल कॉलेज** करिता रेव्ह. जॉन स्टेनली हे नवीन मुख्याध्यापक पुरवल्या बद्दल.

**२२ ऑगस्ट** : आमच्या १६ भाषांतील प्रकाशन केंद्रीय सरकार- Regestered Newspaper of Indiaच्या नियमानुसार नोंदणी करण्यास मार्गदर्शन केल्या बदल.

**२३ ऑगस्ट** : एकचित्ताने त्यांचे काम करणारे समर्पित कर्मचारी वर्ग देऊन आशीर्वादीत केल्या बदल.

**२४ ऑगस्ट** : बंधु इंद्रजीत रॉय यांना आरोग्य दान दिल्या बद्दल.

**२५ ऑगस्ट** : आर्थिक आणि नैतिक पाठबळ देणारे भागीदार देऊन आशीर्वादित केल्या बद्दल.

**२६ ऑगस्ट** : १० ऑगस्ट रोजीचा ५५वा वर्धापन दीन सोहळा आशीर्वादीत केल्या बद्दल.

**२७ ऑगस्ट** :
आशीर्वादीत केल्या बद्दल.

**२८ ऑगस्ट** : आमचे वरिष्ठ पाळक पास्टर एस्. सॅम सेल्वा राज यांचे आत्मचरित्र लिहिण्याचे काम आशीर्वादीत करीत आहे.

**२९ ऑगस्ट** : **नहेम्या बायबल कॉलेज** शिक्षकांस आणि त्यांच्या कुटुंबियांस आशीर्वाद दिल्या बद्दल.

**३० ऑगस्ट** : आमच्या सेंट् पॉल्स मेट्रीक्युलेशन स्कुलच्या मुख्याधापक, स्टाफ आणि विद्यार्थ्यांना आशिर्वादीत केल्या बद्दल.

**३१ ऑगस्ट** :
विश्वासातील भागीदार, आजीवन भागीदार आणि महान आज्ञापालनातील भागीदार व त्यांच्या कुटुंबियांवर दर्शवित असलेल्या दये बद्दल.

**०१ सप्टेंबर** : **एको ऑफ हिज कॉल**च्या मासिक प्रकाशन सेवेस आधार देणारे समर्पित सहाय्यक संपादक पुरवून आशिर्वादीत केल्या बद्दल.

**०२ सप्टेंबर** : **एको ऑफ हिज कॉल** सेवा कार्यास प्लेट मेकर, प्लेट ग्राईंडर, स्क्रीन प्रिन्टर्स यांच्या द्वारे होत असलेल्या बाह्य पाठबळा बद्दल.

**०३ सप्टेंबर** : आमच्या सर्व कर्मचारी वर्गाचे आणि त्यांच्या कुटुंबियांचे रक्षण केल्या बद्दल.

## ✝ प्रार्थने करीता मुद्दे

**०४ सप्टेंबर** : आमचे वरिष्ठ पाळक एस्. सॅम सेल्वा राज आणि त्यांच्या कुटुंबियांचे सर्व प्रकारच्या दुष्ट शक्तीपासून रक्षण व्हावे.

**०५ सप्टेंबर** : आमच्या मुद्रण मशीन चालक, वाहन चालक आणि संगणक चालक अशा सर्व कर्मचाऱ्यां करीता.

**०६ सप्टेंबर** : हल्ले करण्यात आलेल्या ख्रिस्ती जनांच्या पुनर्वसना करीता.

**०७ सप्टेंबर** : २०२३-२४ या शैक्षणीक वर्षाकरीता आमच्या **नहेम्या बायबल कॉलेज** मध्ये निवासी आणि सायंकालीन वर्गात प्रवेशा करीता पात्र विद्यार्थी मिळावेत.

**०८ सप्टेंबर** : **नहेम्या बायबल कॉलेज** शिकविणाऱ्या आणि अभ्यासक्रमाच्या साहित्याचे भाषांतर करणाऱ्या आमच्या सहकर्मचाऱ्यां करीता.

**०९ सप्टेंबर** : ख्रिस्ती उपदेशकांनी सुवार्ता संदेशात भेसळ न करता तो पूर्ण दोष रहित असा द्यावा.

**१० सप्टेंबर** : तुरुंगात सेवा कार्य करणाऱ्या देवाच्या सेवकांसाठी.

**११ सप्टेंबर** : देवाने या भूतलावर त्याचे राज्य उभारण्या करीता लक्ष केंद्रीत करण्यासाठी.

**१२ सप्टेंबर** : तरुणांमधील आणि बाह्य सुवार्ता सेवा कार्या करीता.

**१३ सप्टेंबर** : देवाने प्रत्येक व्यसनाधीन आणि कुकर्म करणाऱ्यांची भेट घ्यावी व त्यांनी पच्छाताप करावा.

**१४ सप्टेंबर** : सर्व ख्रिस्ती संस्था आणि प्रार्थना मंदिरांच्या रक्षणा करीता.

**१५ सप्टेंबर** : लेकरांवर आणि स्त्रियांवर होत असलेल्या अत्याचारात देवाने त्यांचे रक्षण करावे.

**१६ सप्टेंबर** : आमच्या वरिष्ठ पाळकांना त्यांचे आत्मचरित्र लिहिण्यास मनाचा विशालपणा द्यावा.

**१७ सप्टेंबर** : **एको ऑफ हिज कॉल**च्या मुख्य आणि शाखामंडळ्यांतील विश्वासणाऱ्यांच्या कल्याणा करीता

**१८ सप्टेंबर** : वरिष्ठ पाळक पास्टर सॅम सेल्वा राज यांना बहुविविध सेवा कार्यासाठी नवीन दर्शन देऊन आशीर्वादीत करावे.

(पान ४ वरुन)

त्यांना पळवून लावले त्यांचा पूर्णपणे नाश केला आणि आता ते अतिशय भयग्रस्त स्थितीत आहेत. कोठे चुक झाली आहे हे यहोशवाला कळेना, त्यामुळे तो कोशापुढे गेला व उपडा पडून राहिला, देवाच्या समक्षतेत असण्या सारखी दुसरी कोणतीहि जागा नाही. आपण जीवनात हाताळू न शकणाऱ्या धडपडण्याच्या, झगडण्याच्या, आणि वेदनांच्या स्थितीत सामोरे जात असताना बहुतेक वेळा आपल्याला या बहुमोल जागेचा विसर पडतो आणि आपले मित्र आणि कुटुंबिय यांच्याकडे जाण्याचे, मंत्र्यांना फोन करण्याचे ठरवतो. माझ्या बद्दल गैर समजूत करून घेऊ नका, हे करण्यात काहि अयोग्य नाही. परंतु सर्वात प्रथम येशुचे चरण हि आपली जागा असावी. जी मरीयेला अतिशय चांगल्या प्रकारे ठाऊक होती! ती कनानी स्त्री तिच्या मुलीला बरे वाटावे यासाठी जशी येशुच्या पाया जवळ पडली तशाच रितीने आपण पडावे. याकोबाने देवदूताचे पाय घट्ट धरून म्हटले, तू मला आशीर्वाद देत नाहिस तो पर्यंत तुला सोडणार नाही. तुम्ही वाचल्याप्रमाणे, तुम्ही जर देवाकडून कशाची तरी अपेक्षा करीत असाल, तर सर्वप्रथम त्याच्या चरणाजवळ खाली पडा! मनुष्यांच्या चरणावर पडण्यापेक्षा येशूच्या चरणावर पडणे योग्य आहे त्याला म्हणा ''प्रभू तू माझ्या जीवनात काहीतरी केल्याशिवाय मी तुला सोडणार नाही!

यहोशवा कोशापुढे उपडा पडला असताना, देव काही करण्या अगोदर, त्याने यहोशवाला देवाची मदत मिळण्याकरीता काय करण्याची गरज होती ते दाखविले. त्यांच्या युद्धातील अपयशाच्या कोड्यातील गोष्ट शोधण्यासाठी मदत केली. प्रिय मित्रांनो, तुम्ही, तुमच्या जीवनात कोणतातरी बदल घडवून यावा यासाठी देवाला विनंती करीत असाल, तर प्रथम आपल्या जीवनातील परिस्थिती बदल्याची विनंती करण्या अगोदर देवाला विचारा ''प्रभु मजमध्ये काय बदलावे असे तुला वाटत आहे, परमेश्वर यहोशवाला म्हणाला, उठ असा उपडा का पडलास ? इस्राएल लोकांनी पाप केले आहे. ...यास्तव इस्राएल लोकांस आपल्या शत्रूपुढें टिकाव धरवत नाही.'' (यहोशवा ७:१०-१२).

देवाने अचानक उद्धवलेल्या या संकटाचे कारण, यहोशवाला प्रत्यक्षात स्वतः सांगितले. पूर्ण राष्ट्राच्या पराभवाचे कारण एका माणसाने आज्ञाचे पालन केले नाही. देवाच्या सूचनांचे पूर्णपणे पालन करण्यास ते चुकले. प्रिय मित्रांनो, आपले जीवन देवाच्या इच्छेनुसार असण्यात आणि त्याच्या मेहेरबानी जीवनात असण्यास आज्ञा पालन महत्वाचा भाग आहे. आज्ञा पालन हे अर्पणा पेक्षा उत्तम आहे. अर्धवट नाही तर पूर्णपणे आज्ञापालन हे पूर्णपणे आज्ञामोडणे - आज्ञा न पाळणे आहे. देवाने जर तुम्हाला एखादी गोष्ट करण्यास सांगितली तर मागे पुढे करु नका. संशय बाळगु नका आणि परिणामाचा विचार न करता ती करा.

## आखोरची खिंड

### १. अपमान आणि कलंक यांचे प्रतिक

यरिहो बद्दल देवाच्या सूचना अगदी स्पष्ट होत्या. त्याने म्हटले ''**समर्पित वस्तूपासून सर्वथा दूर राहा, त्या समर्पण केल्यावर त्यातली एखादी तुम्ही प्याल तर इस्राएलाच्या छावणीवर शाप आणून तिला संकटात घालाल.**'' (यहोशवा ६:१८)

परंतु आखानाने त्याला सुंदर दिसणाऱ्या वस्तु घेण्याचे ठरविले आणि त्या वस्तु त्याने लपवून ठेविल्या. बिचारा आखान, देव सर्व काहि पाहू शकतो हे देवाचे सामर्थ्य समजण्यास चुकला. देव आखानावर क्रोधीत झाला! ''**लुटीमध्ये एक चांगला शिनारी झगा दोनशे शेकेल रुपे आणि सोन्याची पन्नास शेकेल वजनाची एक विट ह्या वस्तू मला दिसल्या तेव्हा मला लोभ सुटून मी त्या घेतल्या. पाहा, माझ्या डेऱ्यामध्ये त्या जमिनीत पुरलेल्या आहेत. रुपे खाली आहे.**'' (यहोशवा ७:२१).

आखानाने केलेली निवड आणि घेतलेल्या निर्णयाचा गंभीर परिणाम झाला. त्याचा फार मोठ्या प्रमाणावर परिणाम त्यांच्या पत्नीवर आणि लेकरांवर झाला इतका की त्यांनी त्यांच्या वडीलांच्या पापाबद्दल स्वत:चा प्राण दिला. संपूर्ण राष्ट्राच्या समोर त्याच्या पत्नीस आणि लेकरांस मरेपर्यंत दगडमार करण्यात आला. आखानाचाच केवळ नाही तर त्याच्या संपूर्ण कुटुंबाचा अपमान झाला.


## नहेम्या बायबल सायं कॉलेज
### चेपोक आणि संतोषपूरम, चेन्नई

REACHING NATIONS

माध्यम : तमिळ

ATA
Regd. Candidate for Membership
NEHEMIAH BIBLE COLLEGE
CHENNAI
ECHO OF HIS CALL ★ Estd. 1969

विद्यार्थी ATA सभासद नोंदणीस पात्र

**आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ट पाळकांद्वारे ५३ वर्षांपासून मान्यता प्राप्त**

Diploma in Ministry : One year
Diploma in Theology : Two years
Bachelor of Theology : Three years

**शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक**
**प्रवेशा करिता त्वरा करा !**

**Contact : The Chairman, Nehemiah Bible College.**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, BELLS ROAD, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

आपण काही गुप्तपणे करितो त्याचा बाह्य गंभीर दुष्परिणाम असतो. आखानाला वाटले कि त्याने गुप्तपणे चोरुन ते लपविले. परंतु देवाने ते उघड केले; आणि आखान व त्याच्या कुटुंबास शिक्षा झाली. आपण गुप्तपणे जे कांही करीतो त्याबद्दल काळजी घेऊया. ''सगळ्या बऱ्यावाईट गुप्त गोष्टीचा न्याय करीताना देव सगळ्या कृत्याची झाडाझडती घेईल! (उपदेशक १२:१४). आपण गुप्तपणे केलेल्या गोष्टीच्या कृतिचा आपल्या लेकरांवर परिणाम होऊ नये यासाठी एक मिनीट घेऊया आणि हि संधी साधून देवाची क्षमा मागू या.

आपल्या कृतिचा परिणाम एका व्यक्ति पर्यंत जाऊन थांबत नाही तर त्याचा फार मोठा दुष्परिणाम होतो. माझी निवड, माझा निर्णय आणि माझा आज्ञाभंग याचा भविष्यातील पिढीवर फार मोठ्या प्रमाणावर प्रभाव पाडणार.

तरी, देखील कॅलीवरीच्या क्रुसाबद्दल देवाचे आभार माना. ''**जसे त्या एका मनुष्याच्या आज्ञाभंगानें बहुत जण पापी ठरले, तसे ह्या एकाच्या आज्ञापालनाने बहुत जण नीतिमान ठरतील!**'' (रोम ५:१९)

मी आखानाच्या गोष्टीकडे त्याच्या कुटुंबाच्या दृष्टिकोनातून पाहात होते. या परिस्थितीबद्दल त्याच्या लेकरांना आणि पत्नीला काय वाटले असेल? या पापात त्यांच्या सहभागाबद्दल काही बोलले गेलेले नाही तेव्हा संशय नको म्हणून धरुन चालू या, कि त्यांना त्याबद्दल काही देखील ठाऊक नव्हते. एके सकाळी संपूर्ण राष्ट्राने तुम्हाला बाजूला काढले, दोष लावला, अपमानीत केले आणि तुमचा सहभाग नसताना कारण ती दुसऱ्या कोणाची तरी चुक होती.

तुम्ही हा लेख वाचत असताना, कदाचित तुम्ही विचार करीत असाल, आज मी या परिस्थितीत दुसऱ्याच्या चुकीमुळे आहे. त्याकरिता मला शिक्षा की व्हावी? यासाठी देव का काही करीत नाही?

उलटपक्षी, त्यांना काही तरी माहित असेल - तो काही तरी लपवित आहे हे त्यांनी पाहिले असेल तरी ते गप्प राहिले. मी असा विचार करीत आहे, ''मी का त्रास करून घ्यावा? याला मुक सहभाग म्हणतात, कांही वेळा देवाच्या विरुद्ध कांही गोष्टी केल्या जात असतील तर आपण गप्प बसू शकत नाही, हे आपल्या समजले पाहिजे. आपण सत्याच्या बाजूने उभे राहिले पाहिजे.

आखानाच्या पापामुळे इस्राएल दोषी ठरला. केवळ एका व्यक्तीने आज्ञाभंग केला. परंतु पूर्ण इस्राएलला जबाबदार धरण्यात आले. एका माणसाच्या पापामुळे देवाने संपूर्ण राष्ट्राला का शिक्षा करावी? या जगात पापाचा प्रवेश कसा झाला? तर तो एका माणसाच्या आज्ञाभंगामुळे, आणि त्याचा परिणाम संपूर्ण जगावर झाला. परंतु देवाचे आभार मानू या, यासाठी की एका माणसाच्या (येशू ख्रिस्त) आज्ञापालनामुळे आपल्याला तारण मिळाले! आखानाच्या पापाने संपूर्ण समाजावर मोठ्या प्रमाणात परिणाम झाला!

## २) लपवलेल्या पापाचे चिन्ह

आखानाच्या आज्ञाभंगामुळे त्याला त्याला त्याचे पाप लपविण्यास भाग पाडले.

## एको ऑफ हिज कॉल टपाल द्वारे अभ्यासक्रम

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभूत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला 'न्यु लाईफ फॉर यू' या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुर्वानिक, ख्रिस्ती पुढारी आणि अरिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. '**सर्टफिकेट इन मिनिस्ट्री**' प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

***अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -***

**अध्यक्ष - नहेम्याह बाईबल कॉलेज**

Echo of His Call, Post Box 2957
CHEPAUK, CHENNAI - 600 005.
Ph.: (044) 2852 8282, 2852 9293, 2854 7766,
Cell : 98410 71852, 95661 31858
E.mail : biblecor@yahoo.co.in

## एको ऑफ हिज कॉल

### मासिक (विनामुल्य) मिळविण्याची उत्तम संधी

तुम्ही तुमच्या मित्रांचे/नातेवाईकांचे पत्ते आमच्याकडे पोस्टाद्वारे, पत्राद्वारे, ई.मेल, वॉटस् अॅप किंवा फोन द्वारे पाठविल्यास, आम्ही त्यांना त्यांच्या पत्त्यावर मासिक विनामुल्य पाठवित जाऊ.

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर ''**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**'' च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | | |
|---|---|---|
| Account Name | : | ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST |
| Account Number | : | 1023 2923 805 |
| Bank Name | : | STATE BANK OF INDIA |
| Branch | : | TRIPLICANE, CHENNAI - 600 005 |
| IFSC Code | : | SBIN 0000249 |
| SWIFT Code | : | SBI NIN BB 455 |



# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

**"नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !" (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**




### चमत्कारासाठी त्याजवर विश्वास ठेवा ! BELIEVE HIM FOR MIRACLES!

### ज्याने आमच्या दैन्यावस्थेत आमची आठवण केली. त्याचे, कारण त्याची दया सनातन आहे. (स्तोत्र १३६:२३)

१९७१ साली, माझ्या सेवेच्या सुरुवातीच्या दिवसात मी चेन्नाईच्या पोस्ट कार्यालयात, टपाल पेटी साठी अर्ज केला आणि मला २९५७ क्रमांकाची टपाल पेटी मिळाली. त्या दिवसात मला स्वतः चे रहाण्याचे घर नसल्यामुळे, पत्र प्राप्त करण्या करीता त्याची आवशकता होती.

त्या दिवसात मी सेवेसाठी लागणारा सर्व खर्च माझ्या मासिक पगारातून करीत असल्यामुळे आर्थिक ताण सोसावा लागत होता. अनेक वेळा उपाशी राहून आर्थिक अडचणींना सामोरे जावे लगत असे. परंतु देव मजबरोबर होता आणि मी माझ्या सेवेच्या आणि जीवनाच्या सर्व गरजासाठी त्याजवर भरोसा ठेवू शकत होतो. आणि त्याचा हात मजवर आहे हे पाहू शकत होतो.

१९७६ साली, एका वेळी **एको ऑफ हिज कॉल** मासिकाच्या छपाईचे बिल भऊ शकलो नाही. अनेक दिवस प्रार्थना करून देखील देवाकडून मला उत्तर मिळाले नाहि. माझ्या समोर 'टपाल पेटी' रद्द करून त्याबद्दल पोस्टातील अनामत जमा केलेले ५०० रु. परत मिळविण्या शिवाय दुसरा पर्याय नव्हता.

त्यामुळे पोस्ट कार्यालयात गेलो व तेथील पोस्टमास्टर यांना माझी २९५७ क्रमांकाची पत्र पेटी रद्द करुन मला अनामत म्हणून जमा केलेली रुपये ५०० परत करण्याविषयी अर्ज दिला. त्यांनी मला 'पत्र पेटी' पुनः परत मिळवण्यासाठीच्या अडचणी समजावून सांगण्याचा प्रयत्न केला व माझा अर्ज स्विकारण्यास विलंब लावीला. माझ्या असहायते बद्दल मला दुःख झाले, सरते शेवटी त्यांनी मला माझा अर्ज स्विकारुने मला माझी अनामत रक्कम परत केली.

मी त्यांच्या खोलीतून बाहेर पडलो तेव्हा; मिस्टर गोविंदन नावाच्या एका कार्यालयीन स्टाफने 'पत्र पेटी' रद्द करण्याविषयीचे कारण विचारले. मी त्यांना माझ्या आर्थिक परिस्थिती विषयी सांगितले. त्यांनी तातडीने पैशांची जुळणी केली व मला पुनः पोस्ट मास्तरांच्या खोलीत नेले व त्यांच्यावर दबाव आणून मला परत एकवार ती 'पत्र पेटी' परत मिळवून दिली. प्रभुचा महिमा होवो.

माझ्या जीवनातील सर्व चढ उताराच्या प्रसंगात, देव मजबरोबर विश्वासू होता. त्याने दारिद्र्यात, आजारात आणि गरजांच्यावेळी मला मदती करीता त्याचे दूत पाठविले तो महान परमेश्वर आहे. तोच देव कोणाच्याहि जीवनात कोणत्याहि वेळी चमत्कार घडवू शकतो, प्रिय वाचकहो, तुम्ही देखील तुमच्या जीवनात चमत्कार घडावा यासाठी विश्वास ठेवू शकता.

************

त्याने काय केले हे कोणालाही ठाऊक नव्हते. त्याचा लोभ, अभिलाषा यांचा शेवट केवळ त्यालाच नाहि तर कुटुंबाला देखील किमत मोजावी लागली स्तोत्रकर्ता म्हणतो देवाला सर्व ठाऊक असते.

**"हे परमेश्वरा, तूं, मला पारखिले आहे, तू मला जाणीतोस माझे बसणे व उठणे तू जाणीतोस, तू दुरुन माझे मनोगत समजतोस, तूं माझे चालणे व माझे निजणे बारकाईने पाहतोस, आणि माझ्या एकंदर वर्तनक्रमाची माहिती तुला आहे."**

आपण आपले पाप लपवितो, त्याचा गंभीर परिणाम असतो. ते कोठे लपविले ते उजेडात आणले जाईल "**माझे डोळे त्यांच्या सर्व मार्गावर आहेत; ते मला गुप्त नाहीत, त्यांचे दुष्कर्म माझ्या डोळ्यांपासून लपलेले नाही.**" (यिर्मया १६:१७).

देवाला आपली गुपिते ठाऊक आहेत. आपण ती देवापुढे पसरून ठेविली पाहिजेत, त्याची कृपा भरपूर आहे. त्यामुळे आखाना प्रमाणे आपल्याशी तो वर्तणार नाही. देवाला आपल्या इच्छा ठाऊक आहेत. आपण ते काय आणि कां करितो यामागील आंतरिक प्रेरणा प्रकाशात आणतो - इतकेच केवळ नाहि, तर जे अंधारात असलेले पराभवाच्या स्थळातून बाजूल व्हावे असे वाटते, अपमान आणि पेंचात - अडचणी अशा स्थितीतून, तर आपण उघडपणे देवासमोर यावे. देवाशी प्रामाणिक रहा; जुन्या करारातील दिवसप्रमाणे, आपण मागितल्यास, येशूचे रक्त आपल्यासाठी मध्यस्थी करण्याकरीता उपलब्ध आहे.

**"आखान यहोशवास म्हणाला, मी खरोखर इस्त्राएलाचा देव परमेश्वर याचा अपराध केला आहे; मी जे काही केले आहे ते हे - लुटीमध्ये एक चांगला शिनारी**

**झगा, दोनशे शेकेल रुपें आणि पन्नास शेकेल वजनाची एक सोन्याची वीट ही माझ्या दृष्टिस पडली तेव्हा मी त्याचा अभिलाष करुन घेतली; ती पहा; माझ्या डेऱ्यात जमिनीत पुरलेली आहेत आणि झग्याखाली चांदी आहे. तेव्हा यहोशवानें जासूद पाठविले, ते डेऱ्याकडे धावत गेले आणि झगा त्याच्या डेऱ्यात लपविलेला असून त्याच्याखाली रुपें ठेविले आहे असे त्याच्या दृष्टीस पडले. त्यांनी ते डेऱ्यातून काढून यहोशवा आणि सर्व इस्राएल लोक यांजकडे आणून परमेश्वरापुढे ठेविले.''** (यहोशवा ७:२०-२३)

कृपया आपण स्वत:चे परिक्षण करू या. आपल्या जीवनात, कांही लपविलेले पाप आहे कां? तुमची वेळ तुम्ही कशी खर्च करिता? तुमच्याकडे कोणी पाहात नाही आशा वेळी तुम्ही कसा खर्च करिता? तुमच्या मोबाईवर तुम्ही कोणते कार्यक्रम पाहाता? देवाबरोबर समय व्यतीत करण्या ऐवजी तुम्ही समाजीक माध्यमामध्ये अधिक समय घालविता? तुम्ही तुमच्या समस्यांविषयी बोलता किंवा स्वत: दिलेल्या वचनाबद्दल बोलता? तुमच्याकडे गुप्त जीवन आहे? देवाबरोबर मनमोकळे बोलण्याची हि वेळ आहे. **बंद दरवाज्याच्या मागे काय करतो महत्वाचे आहे! देवाच्या वचनाचे अधिक वाचन करा! अधिक वेळ प्रार्थना करा.**

### ३) नवीन सुरुवात आणि आशा यांचे चिन्ह

दु:ख, त्रास, अपयश, शाप, मृत्यु, नाश आणि निराशा यांचे चिन्ह असलेली आखोर खिंड, ही नवीन आशा आणि नविन सुरुवात यांचे चिन्ह बनली. ती आशेचे द्वार बनली. होशेय २:१५ हे कसे शक्य आहे?

आखान आणि त्यांच्या कुटुंबाच्या (देवाची शिक्षा) मृत्युनंतर, संपूर्ण इस्राएल लोकांनी पच्छातापाने देवाकडे गेले. देवाने पापाबद्दल शिक्षा केल्यानंतर त्यांच्यावर मेहेरनजर केली त्याचा त्यांच्यावरील क्रोध शमला आपण क्रुसाद्वारे इतके काही आशीर्वादीत झालेले आहोत की आपल्याला शिक्षा भोगावी लागणार नाही. आपण पापाची कबुली देतो, तेव्हा तो क्षमा करण्यात विश्वसनीय आहे. ''**तेथून मी तिचे द्राक्षीचे मळे तिला देईन, आशेचे द्वार व्हावे म्हणून मी तिला आखोर खिंड देईन; ती आपल्या तारुण्याच्या दिवसांतल्याप्रमाणे, ती मिसर देशांतून निघून आली त्या दिवसांतल्याप्रमाणे, माझे बोलणे त्या ठिकाणी ऐकले.**'' होशेय २:१५ आखोर खिंड आशीर्वादाचे स्थान झाली.

तुम्ही हा संदेश वाचत असताना कदाचित विचार करीत असाल; तुम्ही आता अगदी शेवटच्या टोकाला येऊन पोहोचला आहात; काही आशा उरली नाही, भोवताली सर्व काही नकारात्मक आहे.; तुम्ही कदाचीत निराशेचा संदेश ऐकला असेल; तुम्ही कदाचीत विचार कराला आता हा शेवट आहे, पुर्णविराम! माझ्या प्रिय बंधुंनो आणि बहिणींनो, प्रभू येशू ख्रिस्त या जगात अशक्य ते शक्य करण्याकरिता आला. त्याला मृतअवस्थेतील गर्भाशयाला जीवीत करणे शक्य झाले; एका मृत व्यक्तिला पुन: जीवीत केले, बंद नेत्र उघडले गेले; जेथे मार्ग नव्हता, ते अधिक मार्ग उघडणे त्याला शक्य झाले. तुम्हाला अतिशय निराश वाटत आहे कां? तुमच्या करिता मजकडे एक मोठी बातमी आहे. तुम्हाला लज्जीत केले गेले. त्याच जागी देव तुमचे मस्तक वर उचलील. तुमचे शिंग उन्नत करील आणि तुमच्या शत्रूच्या समोर तुमच्या मस्तकावर तेलाभिषेक करील ते घडावे यासाठी आपल्याला काहितरी करावे लागतील आणि त्याच्याकडे क्षमायाचना मागून आणि त्याची पुन: पुनरावृत्ती न करण्यास मदत मागावी.

देवाबरोबर आपले नाते पूर्ववत प्रस्थापित करणे महत्त्वाचे आहे. देवाबरोबरचे आपले नाते सरळ झाले, जो तुमची गोष्ट पुढे काही खळबळ जनक, पानांनी लिहून काढण्यास तुमचा पूर्णविराम. स्वल्पविरामात बदलेले तुमचा देवाबरोबरचा संबंध पुन:स्थापित झाल्यावर तो तुम्ही गमावलेले सर्व पुन:स्थापित करील.

ती जागा (आखोर खिंड), अशान्तता आणि वेदना यांची जागा, तुम्ही प्रभुचा धावा कराल तेव्हा शान्तिची जागा होईल. ''**माझा धावा करणाऱ्या लोकांसाठी शारोन कळप चारण्यांचे कुरण होईल, अखोराचें खोरे गुरांचा गोठा होईल.**'' (यशया ६५:१०)

प्रिय बंधुंनो आणि बहिणींनो, आखोर खिंड पासून ते आशेच्या द्वारापर्यंतचा प्रवास हा :-

- आपमाना पासून आशेचा प्रवास.
- पच्छातापा पासून काहितरी नवीन उभारण्याचा प्रवास.
- निराशा, पराभव, उद्वेग, मृत्यु यापासून ते आनंददायी - सुखकारक मुक्कामा पर्यंतचा प्रवास.
- आमच्या समस्या आणि त्रास आम्हास आशा देणाऱ्या देवाच्या हातात-हात घालून त्याला हाताळू देणाचे ठरवू.
- आपली दु:खे / आखोर खिंड हि शिकण्याचा प्रसंग आहे असे जर ठरवितो.
- जर ''संकटाचा परिणाम धीर आणि धीराचा परिणाम कसाला लागणें, कसाला लागण्याचा परिणाम आशा या क्रमाने या सर्वांकडे पहाण्याचे ठरवितो.
- आपण हे शिकले पाहीजे की संकटे आणि धीर असल्याशिवाय आपणाला आशा प्राप्त होऊ शकत नाही.
- आपण असा विश्वास बाळगण्याची गरज आहे की, त्याने मला चालविले आहे आणि तो अगोदरच्या सर्व प्रसंगात मजबरोबर होत आला, आणि आता तो मला सोडून देणार नाही.
- कोणतीही सुधारणा सुखकारक अनुभव नसणार तर तो कठीण, वेदनामय आणि गोंधळ असणार तरी त्याचा शेवट निश्चितच आशीर्वाद असणार.

माझी प्रार्थना आहे, तुम्ही स्वत:ला देवाच्या हातात जेव्हा सादर कराल, तो तुमच्या मागण्याच्या आणि कल्पनेच्या पलीकडे अधीक देण्यास समर्थ आहे. तुमची आखोर खिंड येशूच्या नामात आशेचे द्वार बनो.

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/21-23 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/21-23

## एको ऑफ हिज कोल

**यु ट्युब सबस्क्राईब करा**

जेव्हा तुम्हाला वेळ मिळेल तेव्हा कृपा करुन आमच्या **एको ऑफ हिज कॉल यु ट्युब चॅनल** बघा व सबस्क्राईब करा. धन्यवाद

**- संपादक**

## OUR BANK DETAILS:

### *1. Bank : State Bank of India*

| | | |
|---|---|---|
| Branch | : | **Triplicane, Chennai-5** |
| Name | : | **S. Sam Selva Raj** |
| A/C No. | : | **1023 2934 679** |
| IFSC | : | **SBIN 00 00 249** |

SWIFT CODE : **SBI NIN BB 455**

### *2. Bank : ICICI Bank*

| | | |
|---|---|---|
| Branch | : | **Anna Salai, Chennai-6** |
| Name | : | **Echo of His Call** |
| A/C No. | : | **6038 0502 2319** |
| IFSC | : | **ICIC 000 6038** |

### *3. Bank : State Bank of India*

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

| | | |
|---|---|---|
| Branch | : | **Triplicane, Chennai-5** |
| Name | : | **Echo of His Call Educational Trust** |
| A/C No. | : | **1023 2923 805** |
| IFSC | : | **SBIN 00 00 249** |

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**

*****

**E.mail : sam@echoofhiscall.org**

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-     आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.com

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
**Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/21-23**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/21-23**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"**
**on 12th AUGUST 2023**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
**P.O. Box No. 2957,**
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**

***JESUS LOVES YOU!***

**To**

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj** at **Echo of His Call Printers,** New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**